**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सोमवार दि. ३० मे २०११ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १३९ वी बैठक सोमवार दि.३० मे २०११ रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. शिवाजी दिवेकर, | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| २) | मा.श्री. हेमराज शाह | सदस्य |
| ३) | मा. श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा.श्री.कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ५) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ६) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ७) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ८) | मा.श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ९) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १०) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्या |
| ११) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १२) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १३) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १४) | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १५) | मा.डॉ.श्री.ल.पुलकुंडवार | कक्ष अधिकारी |
| १६) | श्री.ओ.बी.साहू | सहमुख्य अधिकारी |
| १७) | श्री.महिषी,निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस श्री.महिषी यांनी मा.श्री.सुभाष हजारे, मुख्य अधिकारी हे सुट्टीवर असल्यामुळे त्यांचा कार्यभार श्री.शिवाजी दिवेकर यांचेकडे सोपविण्यांत आले आहे असे कळविले. तसेच प्रथम त्यांची ओळख व स्वागत करण्यांत आले. तद्नंतर सचिव श्री.महिषी यांनी सर्व सन्मा.सदस्यांच्या स्वागत करुन आजची बैठक मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी श्री.शिवाजी दिवेकर यांचे अध्यक्षतेखाली व त्यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक : - १३९/**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.२६ एप्रिल २०११ रोजी झालेल्या १३८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यबाबत.

------------o-o-----------

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र. १ ते १४ वर सादर करण्यांत आले आहे.

बैठकीच्या सुरुवातीस सन्मा सदस्य श्री.बशीर पटेल यांनी मा.अध्यक्ष व सभागृहाच्या असे निदर्शनास आणले की, मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन महोदयांना आपण एफएसआय वाढविणेबाबत एक पत्र दिले होते, सदर प्रस्तावास मंजूरी प्राप्त झालेली असून आता किमान चटईक्षेत्र निर्देशांक भूखंडाच्या २.५ वरुन ३.० करण्यांत आलेला आहे. त्यामुळे याबद्द आपण मा.मुख्यमंत्री ,मा. उपमुख्यमंत्री तसेच मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण ) महोदयांचे अभिनंदन केले पाहिजे. तसेच प्रशासनाकडून त्यावर कार्यवाही करण्याबाबत सूचना केली तसेच त्यांना मा.मंत्रीमहोदयांकडून प्राप्त झालेल्या पत्राची झेरॉक्स प्रतही त्यांनी सचिव श्री.महिषी यांना दिली.

सन्मा सदस्य श्री. किसन जाधव यांनी सन्मा सदस्य श्री.बशीर पटेल यांनी वर मांडलेल्या अभिनंदनाच्या प्रस्तावास सर्व सन्मानिय सदस्यातर्फे पाठींबा असल्याचे जाहिर करुन त्यांस सर्व सन्मा. सदस्यांची मंजूरी असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी असेही स्पष्ट केले की, भविष्यांत ३.० ( वाढलेल्या ) FSI मुळे जुन्या इमारतीतील मराठी व गरीब माणसांना चांगले घर प्राप्त होवून त्यांना न्याय मिळेल तसेच विकासक सुद्धा चांगल्या प्रकारे विकास करु शकतो.

यावर सचिव श्री.महिषी यांनी सर्व सन्मा.सदस्यांना ३.० एफएसआय बद्दल शासनाने काढलेल्या अधिसूचनेची प्रत सर्वांना वितरित करण्यांत येत असून त्यामध्ये काही सूचना असल्यास सांगावे असे सांगितले व याबाबत नंतर चर्चा करण्यांत येईल.

तसेच सचिव श्री.महिषी यांनी सभागृहातील सर्व सन्मा.सदस्यांना अशी माहिती दिली की, यावर्षी १९ इमारती धोकादायक म्हणून घोषित करण्यांत आलेल्या असून, त्याबाबची विस्तृत माहिती सर्वाना आता देण्यांत आलेली आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव व इतर सदस्यांनी असा मुद्या उपस्थित केला की सदर शासनाच्या ठरावामध्ये आमच्या काही शंका आहेत, जशा की एखादया इमारतीस

आपण पूवी एनओसी दिलेली असून त्यामध्ये त्याला २.५ एफएसआय प्रमाणे नवीन धोरणाप्रमाणे जर त्याला आपल्या वाढवून ३.० एफएसआय दयावयाचा झाल्यास तर कसा प्रकारे देवू शकतो. याबबत त्यांनी सचिव,श्री.महिषी यांना खुलासा करण्याबाबत सांगितले.

यावर श्री.महिषी यांना असे स्पष्ट केले की, अधि सूचनेनुसार नवीन प्रकरणात एनओसी देण्याचे प्रस्ताव शासनाकडे पाठविणे आवश्यक नाही परंतु पूर्वी २.५ प्रमाणे मंजूरी दिलेल्या प्रस्तावाना जर फेरबदल म्हणजे ३.० एफएसआय वाढविणेसाठी प्रस्ताव एकादया विकासकाकडून प्राप्त झाल्यास त्याचे पुनर्विकासाचे काम कितपर्यत झालेले आहे व ते जर प्लींथपर्यंत असेल तर अशा प्रस्तावाना मंजूरी घेणेकरिता प्रस्ताव शासनाकडे पाठविणे नवीन शासनाच्या पॉलिसीप्रमाणे बंधनकारक आहे. तसेच याबाबत अजूनही कार्यपध्दती ठरविण्यांत आलेली नाही. कार्यपध्दती ठरल्यानंतर सर्व सन्मा.सदस्यांना माहिती देण्यांत येईल.

सन्मा.सदस्य मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट यांनी असा मुद्दा उपस्थित केल्या की धोकादायक इमारतीचे सर्वेक्षण आपण महानगर पालिकेप्रमाणे करतो की कसे तसेच ज्याइमारती धोकादायक म्हणून आपण घोषित करतो पुढे धोकादायक नसलेल्या इमारती पडतात किंवा अपघात होतात. तसे भविष्यात होवू नये याबाबत कोण-कोणत्या खबरदारी घेण्यांत आलेल्या आहेत.

यावर उपमुख्य अभियंता श्री.अर्गेकर यांनी खुलासा केला की, सदर घोषित झालेल्या धोकादायक इमारतीबाबत प्रत्येक विभागातील कार्यकारी अभियंता त्याबाबत सभागृहाला माहिती देतील तसेच सदर इमारतींचे सर्वेक्षण आपण महानगर पालिकेप्रमाणे न करता आपल्याकडे याबाबत वेगळी पध्दत आकारली जाते. मंडळाच्या अभियंत्यातर्फे थेट सर्वेक्षण होऊन उपकर प्राप्त इमारती अति धोकादायक म्हणून घोषित करण्यांत येतात.

प्रत्येक विभागातील कार्यकारी अभियंताना आपआपल्या विभागातील धोकादायक इमारतीबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच त्यामध्ये येणा-या अडचणीवर कशा प्रकारे कार्यवाही करण्यांत येते त्याची माहिती त्यांना सभागृहाला दिली, जसे की जेथे भाडेकरु इमारत खाली करत नाही, तेथे पोलिसांची मदत घेवून, काही अपवादक परिस्थिती एफआयआर नोंद करुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत येत आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी बैठकीत असा मुद्दा उपस्थित केला की, सदर धोकादायक इमारतींची यादी अगोदर वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द होते व नंतर आम्हाला देण्यांत येते याबाबत सर्व सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच सन्मा सदस्य व श्री.हरिष सणस यांनी असा मुद्दा उपस्थित केला की मा.सभापती श्री.सचिन अहिर साहेब असताना सर्व धोकादायक इमारतीची सर्व सन्मानिय सदस्य व मंडळाचे सर्व संबंधित

Rlog.

अधिकारी तसेच पत्रकार यांचेसह एकत्रित कार्यक्रमाचे आयोजन व्हायचे तद्नंतर सर्व धोकादायक इमारतीची पहाणी करुन, त्यामध्ये काही अडचणी आहेत का याबाबत सखोल चर्चा झाल्यानंतर धोकादायक इमारतीची यादी घोषित करण्यांत येत असे, अशी मागील तीन वर्षापासून प्रथा होती परंतु सध्या मा.मुख्य अधिकारी सुट्टीवर असल्यामुळे हा गोंधळ होत आहे का अशी शंका उपस्थित केली. तसेच त्यांनी असेही स्पष्ट केले की. मा.सभापती श्री.सचिन अहिर साहेब असताना ते स्वतः पत्रकार परिषद आयोजित करुन त्यामध्ये धोकादायक इमारतींची यादी घोषित करीत असत. परंतु मागील दोन वर्षापासून आपण धोकादायक इमारतीची यादी प्रसिध्द करुन नंतर येणा-या मंडळाच्या बैठकीत माहितीस्तव यादी सादर करण्यात येते.

तथापि धोकादायक इमारतींना भेट देण्याचा कार्यक्रम आताही करु शकतो, त्याप्रमाणे तारीख नक्की करुन सर्व सन्मानिय सदस्याना कळविण्यात येईल.

पुढच्या वेळी धोकादायक इमारतींची यादी प्रसिध्द होण्यापूर्वीच सन्माननीय सदस्याना देण्यात येईल व त्यांनी याबाबत संबंधित अधिका-याना याची नोंद घेणेबाबत मा.मुख्य अधिकारी यांनी सूचना केली.

सन्मा.सदस्या श्रीमती उल्का पाटकर यांनी बोटावाला चाळीतील भाडेकरुंबाबत काळजी व्यक्त केली, त्यांनी असेही सभागृहास सांगितले की, मी स्वतः बोटावाला चाळीतील रहिवाशी असून मागील चार वर्षापासून सदर इमारत धोकादायक म्हणून घोषित करण्यांत येवून सुध्दा त्याइमारतीत आजही भाडेकरु रहात आहेत, तसेच यावर्षी पावसाळापूर्वी सदर इमारत खाली करुन न घेतल्यास सदर इमारत कधीही कोसळण्याची शक्यता आहे, याची सर्व मंडळाच्या अधिकारांनी नोंद घ्यावी, अशी त्यांनी विनंती केली तसेच त्यांनी पुढे असा मुद्या उपस्थित केला की, मागील कितीतरी महिन्यापासून भाडेकरुना व्हेकेशन नोटीस बदलून देणेबाबत मंडळाकडून कार्यवाही होत आहे परंतु ती आजपर्यंत पूर्ण झालेली नाही.

यावर श्री.महिषी यांनी असे स्पष्ट केले की, याबाबत सर्व कार्यकारी अभियंता यांचेशी चर्चा करुन सुधारीत व्हेकेशन नोटीसचा मसूदा विधी सल्लागार/प्राधिकरण यांचेकडून मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे मंजूरीसाठी प्राप्त झाला असून, त्यानुसार कार्यवाही करण्यांत येईल.

यावर मा.सन्मा.सदस्या श्रीमती अल्का पाटकर यांनी असा मुद्या उपस्थित केला की जर तुम्ही आता पूर्वीच्या व्हेकेशन नोटीस रद्द करुन नवीन व्हेकेशन नोटीस देणार आहात व अशा कार्यवाहीत जर बनावट व्हेकेशन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच बोटावाला चाळीतील रहिवाशांना सायन व इतर चांगल्या ठिकाणच्या संक्रमण शिबिरात हलविणेबाबत त्यांनी मा.अध्यक्षांना विनंती केली.

श्री.महिषी यांनी असे सांगितले की. नवीन व्हेकेशन नोटीस देणे अगोदर जुनी व्हेकेशन नोटीस भाडेकरुंकडून घेतल्याशिवाय व ती कार्यालयात मूळ स्वरुपात जमा केल्याशिवाय नवीन व्हेकेशन नोटीस देण्यांत येणार नाही. तसेच यामध्ये काही अडचणी भविष्यात उद्‌भवणार नाहीत याची काळजी संबंधितांकडून नक्कीच घेतली जाईल.

यावर मा.सन्मा.सदस्या श्रीमती अल्का पाटकर यांनी असाही मुद्या उपस्थित केला की फक्त बोटावाला चाळीतील रहिवाशांसाठी हा जर निर्णय घेतला की व्हेकेशन नोटीस बदलून देण्यात येणार असतील तर अशा इतरही इमारती आहेत, त्याबाबतही विचार व्हावा.

यावर श्री.महिषी यांनी असे स्पष्ट केले की, बोटावाला चाळी संबंधात वरिष्ठ पातळीवर चर्चा झाल्यानंतरच त्यावर असा निर्णय झाला की, सदर व्हेकेशन नोटीस रद्द केल्याशिवाय पुढील कार्यवाही करणे शक्य नाही म्हणून वरील प्रमाणे व्हेकेशन नोटीस बदलून देणेबाबतचा निर्णय खास बाब म्हणून घेण्यात आल्याबाबत खुलासा केला.

यावर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनीही बोटावाला चाळीतील भाडेकरुंबाबत त्वरेने निर्णय घेवून नवीन व्हेकेशन नोटीस देणेबाबत घेतलेला निर्णय ठीक आहे परंतु यामध्ये खबरदारी घेणे गरजेचे आहे. यामध्ये डयुपलिकेट फाईल होण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे याबाबत कार्यालयाने आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशी माझी मा.अध्यक्ष महोदयांना विनंती आहे.

श्री.महिषी यांनी याबाबत सन्मा सदस्यांच्या असे निदर्शनास आणून दिले की. बोटावाला चाळीतील भाडेकरुना अश्या प्रकारच्या व्हेकेशन नोटीस दिल्या नाहीत तर ते गाळे खाली करीत नाही. त्यामुळे हा पर्याय काढण्यात आलेला आहे. जेणेकरुन भाडेकरुंना संक्रमण शिबिरात हलवून भविष्यात जिवितहानी टळावी.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी ज्या ३३ प्रकरणांवर म्हाडा देय क्षेत्र खुल्या बाजारात विकलेले आहे त्याप्रकरणी कार्यकारी अभियंता यांनी पोलिस स्टेशनमध्ये जावून एफ.आर.आर. नोंदविणे आवश्यक आहेत. सदर कार्यवाही ८ दिवसात पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या MIS व इतर सर्व माहिती संबंधित उपमुख्य अभियंता यांनी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्याबाबत मागील बैठकीत ठरले होते, त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यांत आली.

श्री.महिषी यांनी याबाबत असे स्पष्ट केले की, याप्रकरणी एफ.आर.आर. नोंदविण्यात आलेला नाही. याप्रकरणी पोलिसांकडून काही कागदपत्रांची मागणी करण्यांत आलेली होती ती कागदपत्रे पोलिसाना देण्यांत आलेली असून पुढील कार्यवाही पोलिसांकडून होणे गरजेचे आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी धारावी संक्रमण शिबिरातील घुसखोरीबाबत निलंबित करण्यांत आलेल्या कर्मचा-यांवर व इतर कर्मचारी/अधिका-यांवर

सही/-

कोणती कार्यवाही करण्यांत आली. याबाबत मागील बैठकीत मा.मुख्य अधिकारी/दु.वपु.मंडळ यांनी असे सांगितले की,सदर प्रकरणी मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा. तसेच पोलिस स्टेशन यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कारवाई करण्यांत येईल, तर याप्रकरणी अहवाल प्राप्त झालेला आहे का ?

सदर प्रकरणी श्री.साहू,सहमुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदर कर्मचा-यांकडून याबाबत अर्ज प्राप्त झालेला असून, त्यावर प्रकरणी खातेनिहाय चौकशीसाठी सदर नस्ती प्राधिकरणामध्ये पाठविण्यांत आलेली आहे. त्यावर निर्णय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असा मुद्या उपस्थित केला की, मागील तीन वर्षापासून मी या मंडळाचा सदस्य आहे, मी व सर्व सदस्यांनी व्हेकेशन नोटीसमध्ये सुधारणा व्हावी व त्याबाबत एक सुधारीत नुमन्या तयार करणेबाबत सातत्यांनी विनंती केलेली आहे. कारण जास्त घुसखोरी ही व्हेकेशन नोटीसमधील खाडाखोंड मुळेच होत असतो. तरी खेदाने नमूद करावेसे वाटते की, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

श्री.महिषी यांनी व्हेकेशन नोटीसच्या सुधारणेबाबतच्या प्रस्ताव विधी सल्लागार/प्राधिकरण व मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे मंजूरीस्तव पाठविणेत आलेला आहे, त्यास मंजूरी प्राप्त झाल्यास पुढील कार्यवाही करण्यांत येईल, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सारस्वत बॅकेमार्फत जी भाडेवसुली होत आहे, त्यास प्रतिसाद कसा मिळतो.जर तीन महिन्याचे भाडे एकदम भरल्यास त्यामध्ये भाडेकरुंना जी ३ टक्के सवलत द्यावयाची आहे, तो प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत आलेला आहे. त्याचा योग्य तो पाठपुरावा करावा व सदर प्रस्तावास प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झालेली आहे का ? असे विचारले.

यावर श्री.तपासे, मुख्य लेखाधिकारी यांनी असे सांगितले की सदर प्रस्ताव अजून प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यांत आलेला नाही कारण सदर प्रस्ताव वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांचे कार्यालयात प्रलंबित असल्यामुळे व त्यांचेकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यात येवून त्यावर निर्णय घेण्यांत येईल.

सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी मंगलवाडी येथील योजनेमध्ये खिडक्या लावण्याबाबतच्या प्रस्तावाचे पुढे काय झाले याबद्दल विचारणा केली असता,त्यासाठी एक लाख ऐवढी रक्कम भरण्याबाबत कळविले होते.

श्री.महिषी यांनी सदर प्रस्तावामध्ये वित्त नियंत्रक /प्राधिकरण यांनी काही आक्षेप घेतले आहे. म्हणजे अशा प्रकारची सवलत तुम्ही इतर पुनर्विकसित योजनांमध्ये देणार आहात का त्याचा अहवाल उपमुख्य अभियंता यांचेकडून देण्यांत आलेला असून सदर प्रस्ताव पुन्हा प्राधिकरणाकडे पाठविण्यांत आलेला आहे.

सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी दि.१ एप्रिल २०१० पासून संक्रमण शिबिरात रहाणारे भाडेकरु वाढीव दराने मासिक भाडे भरत आहेत किंवा नाही, किती वसुली झालेली आहे याची माहिती याबैठकीत देण्यांत येईल. असे मागील बैठकीत मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले. परंतु सदर माहिती प्राप्त झालेली नाही.

संक्रमण शिबिरात वर्षानुवर्ष रहात असलेल्या भाडेकरुंना बृहतसूचीवर घेण्याकरिता जी नियमावली बनविलेली आहे, त्याप्रमाणे पात्र व बृहतसूचीवर येण्यास इच्छुक असलेल्या रहिवाशांना रितसर बृहतसूचीवर घेण्यात येईल, ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरु करण्याबाबत मागील बैठकीत सूचना देण्यांत आलेल्या होत्या. तसेच हस्तांतर झालेल्या सदनिकेच्याबाबत, सध्या राहणारा भाडेकरुंच्या नावांने मास्टर लिस्टचे गाळे वितरीत करणेबाबत कार्यवाही सुरु करण्यांत आलेली आहे का ? असे किती भाडेकरु आहेत, त्यांची स्वतंत्र यादी तयार करण्यांत आलेली आहे का, याबाबत विचारणा केली.

सहमुख्य अधिकारी श्री.साहू यांनी सांगितले की, याबाबत सर्वे करण्यांत आलेला आहे परंतु अशी स्वतंत्र यादी अजून करण्यांत आलेली नाही. परंतु ती लवकरच करण्यांत येईल.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी स्ट्रक्चरल ऑडिटचे काय झाले अशी विचारणा केली. त्यावर श्री.महिषी यांनी स्ट्रक्चरल ऑडिटची कार्यवाही महानगरपालिका करणार आहे.

डी.एस.आर.सुधारणेबाबत सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यानी विचारणा केली असता सर्व कार्यकारी अभियंता यांनी दिलेली माहिती विचारात घेऊन उपमुख्य अभियंता यांनी DSR सुधारित केल्यानंतर मुख्य अभियंता-२/प्राधिकरण यांचेकडे मंजूरीकरिता पाठविण्यांत येणार आहे .

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे पुनर्रचित इमारतीतील १८०/२२५ चौ.फूटाच्या गाळयांची यादी तसेच १३१ गाळयांच्या यादीमधील जे १७ गाळे वर्ग केले आहेत. त्यांच्या नस्त्या अजूनही मिळाल्या नसल्याबाबत तसेच श्री.मठपती,उपमुख्य अधिकारी ( पु.गा.) यांनी मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे व मा.मुख्य अधिकारी/दु.व पु. यांनी सूचना केल्याप्रमाणे कोणतीच कार्यवाही केलेली नाहीत. तसेच त्यांनी असेही सांगितले की १३१ गाळयांची जी यादी बैठकीत देण्यांत आलेली आहे ती बरोबर नाही . याचा अर्थ सर्व सन्मा.सदस्यांची मंडळाने दिशाभूल केलेली आहे.

यावर सहमुख्य अधिकारी श्री.साहू यांनी असे स्पष्ट केले की मागील बैठकीत जी

१३१ गाळयाची माहिती देण्यांत आली ती सर्व संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडील रिक्त गाळयाची माहिती एकत्रित करुन सदर माहिती बैठकीच्या आदल्यादिवशी निवासी कार्यकारी अभियंता यांना देण्यांत आलेली होती.तसेच सदर बैठकीच्यावेळी श्री.मठपती,उपमुख्य अधिकारी ( पु.गा.) हे रजेवर असल्याकारणाने कार्यकारी अभियंत्यानी दिलेली माहिती संकलित करुन ती तयार करण्यांत आली होती. यावर श्री.शिरिषकर यांनी १३१ ची यादी बरोबर नसेल तर आजमितीस श्री.मठपती हे बरोबर माहिती का देत नाहीत, अशी विचारणा केली.

मा.मुख्य अधिकारी / दु.व पु. मंडळ यानी मागील बैठकीत सहमुख्य अधिकारी यांना त्यांचे दालनात संबंधित उपमुख्य अभियंता,उपमुख्य अधिकारी ( पु.गा.)यांचेसह सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांचे समवेत बैठक घेण्याबाबत सूचना केली होती, त्याबाबत येथे खेदाने नमूद करावेसे वाटते की, ब-याच पाठपुराव्याअंती बैठक दि.१९/५/११ रोजी आयोजित करण्यांत आली व सदर बैठकीस उपमुख्य अधिकारी/पुगा यांना सहमुख्य अधिकारी यांनी १० ते १५ वेळा फोन केल्यानंतर ते बैठकीस आले, तद्नंतर त्यांनी आपल्या कार्यालयात सदर नस्त्या पहाण्यासाठी बोलविले व प्रत्यक्ष गेल्यानंतर सदर नस्त्या कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयाकडे वर्ग केल्याचे सांगितले, संबंधित कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात चौकशी केली असता सदर नस्त्या त्यांचे कार्यालयात प्राप्त झालेल्या नाहीत असे उत्तर प्राप्त होते.

पुन्हा श्री.मठपती,उपमुख्य अधिकारी/पुगा यांना विचारले असता ते उडवा-उडवीची उत्तर देतात, तसेच १७ पैकी ३ नस्त्या त्यांनी उपलब्ध करुन दिल्या परंतु त्यामधील महत्वाची कागदपत्रे गायब करण्यांत आलेली आढळतात. सदर गाळे वितरण केलेल्या नस्त्या जर कार्यालयातून हरविलेल्या आहेत असे त्यांनी सांगितले. तसेच बैठकीमध्ये ज्या विषयावर चर्चा होते ती पूर्णपणे इतिवृत्तामध्ये येत नाही, असेही त्यानी सांगितले.

सन्मा सदस्य श्री.शिरिषकर यांनी पुढे सांगितले की वितरणाच्या विषयावर चर्चा होत असताना श्री.मठपती,उपमुख्य अधिकारी हे सहमुख्य अधिकारी/ दु. व पु. मंडळ यांचेकडील बैठकीतून उठून गेले व आज ते मंडळाच्या बैठकीत गैरहजर आहेत. अशा अधिका-यावर कार्यवाही होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच मी त्यांच्यावर १२ व १५ अशा एकूण २७ फाईल कार्यालयातून गायब करण्यांत आल्याचा आरोप करत आहे. तसेच सदरच्या फाईल बद्दल माहिती माझेकडे उपलब्ध आहे, परंतु ती मला कार्यालयातून उपलब्ध होणे गरजेचे आहे. मी सदर फाईलबाबत उपमुख्य अधिकारी/पुगा यांना विचारले

असता ते मला सांगतात की याबाबत FIR नोंद करा. मला तर असे वाटते की, त्यांचेवर FIR नोंदविणे गरजेचे आहे.

वरील मुद्दयास सर्व सन्मा.सदस्यानी मान्यता दिली व उपमुख्य अधिकारी/पुगा यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी अशी मा.अध्यक्ष महोदयाना विनंती केली.

सन्मा.सदस्य श्री.हरिष सणस यांनीही वरीलबाबत तिव्र निषेद करुन त्यांना सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले की, जर एखादा विषय बैठकीत तीन वेळा चर्चेसाठी घेतला नंतर ही त्याबाबत कार्यवाही होत नसेल तर संबंधित अधिका-यावर कार्यवाही होणे गरजेचे आहे, आणि असे जर झाले नाही तर पुढील बैठकीत आम्ही सर्व सदस्य बहिष्कार घालणार आहोत, याची मा.अध्यक्ष महोदयांनी नोंद घ्यावी, जर एखादा अधिकारी आम्हाला सांगतो की FIR नोंद करा म्हणजे ही एक प्रकारची धमकी समजावी का, तरी मा.अध्यक्ष महोदयांनी ही बाब गंभीर समजून याबाबत सक्त कार्यवाही करावी, अशी सर्व सदस्यांनी विनंती केली.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, याबाबत सहमुख्य अधिकारी श्री.साहू हे सखोल चौकशी करुन याबाबत अहवाल सादर करतील व त्यामध्ये जर सदर अधिका-यावर कार्यवाही करणे गरजेचे असल्यास त्यांची खातेनिहाय चौकशी करण्यांत येईल

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी असे सांगितले की, २००७ सालापासून आम्ही मंडळाचे सदस्य आहोत त्यामुळे आम्ही सर्व सदस्यांनी २००७ ते २०११ पर्यंत किती गाळे वितरीत केले याची यादी मागील बैठकीत मागितली होती. सदर यादी देण्यांत आली परंतु त्यामध्ये १९९४,१९९५ /९६ साली गाळे वितरण केल्याची माहिती देण्यांत आलेली आहे. आम्ही २००७ साली किती गाळे होते व त्यामधील २००७ ते २०११ पर्यत किती गाळे वितरीत झाले व किती गाळे शिल्लक आहेत याबद्दलची माहिती देणे अपेक्षित होते परंतु माहिती दुसरीच देण्यांत आलेली आहे.

सन्मा.सदस्य श्रीमती सुरेखा पाटील यांनी असे सांगितले की, ज्या इमारतीमध्ये गाळे रिक्त आहेत तेथे स्पष्ट बोर्ड लावण्यांत यावा, जेणेकरुन रिक्त गाळयाची माहिती त्यामध्ये निवासी/अनिवासी याबाबतही स्पष्ट उल्लेख असावा, जेणेकरुन भाडेकरुंना होईल जसे की चितांमणी इमारतीत तशा प्रकारे फलक लावण्यात आलेला आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मा.अध्यक्ष महोदयांना अशी विनंती केली की सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर हे मागील दोन ते तीन महिन्यापासून सदर विषयाबाबत पाठपुरावा करीत आहेत, तरी त्यांनी मागितलेली कागदपत्र कृपया देण्यांत येवून सदर विषयास अंतिमस्वरुप देणेबाबत विचार व्हावा.

२७०६

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यानी असा मुद्दा उपस्थित केला की, संक्रमण शिबिरातील एखादा गाळा रिक्त करणात आल्यास तो सिल केल्यानंतर त्यामध्ये घुसखोरी झाल्यास त्यावर कार्यवाही म्हाडातफै होते की पोलिसातर्फे याबाबत खुलासा व्हावा.

यावर सर्व सन्मानिय सदस्यांनी मा.अध्यक्षांना विनंती केली की, संक्रमण शिबिरातील एखादा गाळा रिक्त झाल्यास तो ताबडतोब गरजू व मागणी असणा-या व्यक्तिस त्वरित वितरित करण्यांत यावा जेणेकरुन त्यामध्ये घुसखोरी होणार नाही.

सहमुख्य अधिकारी श्री.साहू यांनी यामुद्याबाबत असे स्पष्ट केले की, संक्रमण गाळयांच्या संरक्षणाकरिता आपल्याकडे तशी सिक्युरीटीची व्यवस्था नसल्यामुळे घुसखोरी होते. तसेच जेथे गाळा रिक्त आहे तेथे गाळा सिल करण्यांत येवून त्यावर पट्टी मारण्यांत येथे परंतु काही ठिकाणी सिल तोडून घुसखोरी होते, अशा परिस्थितीत मंडळाचे अधिकारी/कर्मचारी त्यांचेस्तरावर जी शक्य आहे ती कार्यवाही करुन जेथे गरज असेल तेथे पोलिस स्टेशनमध्ये तक्रार करुन अपवात्मक परिस्थितीत FIR ही नोदविण्यांत येतो.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सांगितले की मागील बैठकीमध्ये एक अभ्यास गट संघटित करण्यांत आलेला होता त्यामध्ये सन्मा.सदस्य श्री.बशिर पटेल व इतर सदस्य होते तसेच श्री.अर्गेकर,उपमुख्य अभियंता हे निमंत्रक होते, या अभ्यास गटाने एक अहवाल तयार केला होता तो मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यासाठी देण्यांत आलेला होता, परंतु सदर अहवालाबाबत काय झाले सादर करण्यांत आलेला नाही.

मा.मुख्य अधिकारी यांनी अभ्यास गटाने सादर केलेला अहवाल लवकरच मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात येवून नंतर शासनास सादर करणेबाबत संबंधित अधिकां-याना सूचना केली.

सन्मा.सदस्य श्री बांदिवडेकर यांनी एक मुद्दा उपस्थित केला दुरुस्तीच्या कामांसाठी मंडळातर्फे ज्या कंत्राटदारांना नेमलेले असतात त्यांचेवर नियंत्रण ठेवण्यासाठी व त्यांनी एका चौकटीत काम करणेबाबत तसेच त्यांनी कार्यकारी अभियंता यांचेअंतर्गत काम करणे गरजेचे असल्यामुळे याबाबत मागील बैठकीत मा.मुख्य अधिकारी यांनी एक नियमावली तयार करणेबाबत आश्वासन दिले होते परंतु सदर नियमावाली सादर केलेली दिसून नाही. तसेच सदर ठेकेदार जर व्यवस्थीत काम करीत नसेल तर त्याला ब्लॅक लिस्टमध्ये किंवा त्याचे लायसन्स रद्द करण्याबाबत काही नियम आहेत का असे विचारले.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर कंत्राटदारांकरुन काम करुन घेणेबाबत आपण मंडळातर्फे नियमावली तयार करु शकतो, परंतु त्यांचे लायसन्स रद्द करणे किंवा त्याला ब्लॅक लिस्टमध्ये टाकणे याबाबतची कार्यवाही मंडळातर्फे करणे शक्य होणार नाही तर त्याचेवर कार्यवाही एकतर CE किंवा त्यांना मंजूरी देणारे जसे की

२०६

उपमुख्य अभियंता /मुख्य अभियंता हे याबाबत कार्यवाही करु शकता असे वाटते.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी उपमुख्य अभियंता श्री.अर्गेकर हे दि.३१ मे २०११ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असून, त्यांचा अनुभवाचा उपयोग जर मंडळास करुन घेता येत असेल तर त्यांना सेवानिवृत्त नंतर पुन्हा सेवेत कंत्राटी पध्दतीने सामावून घ्यावे, तसेच उपमुख्य अभियंताची मंडळात बरीत पदे रिक्त असून ती लवकरात-लवकर भरण्यांत यावी कारण आता पावसाळयाचे दिवस असून याच कालावधीत मंडळात जास्त अनुभवी अधिका-याची गरज आहे, त्यामुळे सर्व सदस्यांतर्फे आम्ही सदर प्रस्ताव आपल्याला देत आहेत, त्याबाबत जरुर विचार व्हावा, अशी विनंती त्यांनी मा.मुख्य अधिकारी यांना केली.

वरील सविस्तर चर्चेअंती कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक - १३९ -२ (१)**

विषय - उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

१. परिमंडळ-२ मधील (डी-१, डी-२, डी-३, ग-द) १४ इमारती.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **१५ ते २५** वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३९/ १२१९**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १४ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु. ३,२७,४४,५१८/-(रुपये- तीन कोटी सत्ताविस लक्ष चौवेचाळीस हजार पाचशे अठरा फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,३६,२०,६१६ /- (रुपये एक कोटी छत्तीस लक्ष विस हजार सहाशे सोळा फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३९ -२ (२)**

२ विषय - परिमंडळ-४ मधील (ग-उत्तर, फ-उत्तर, फ-दक्षिण) १६ इमारती.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **२७ ते ३९** वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

R/७६

**<u>ठराव क्रमांक - १३९/१२२०</u>**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १६ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.३,१६,५१,९०३ /-(रुपये- तीन कोटी सोळा लक्ष एक्कावन्न हजार नऊशे तीन फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. २,११,१३,०५६/- (रुपये दोन कोटी अकरा लक्ष तेरा हजार छपन्न फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o-----------

**<u>बाब क्रमांक - १३९ -३</u>**

विषय - उपमुख्य अभियंता-परिमंडळ-४ मधील ग-उत्तर, फ-उत्तर, फ-दक्षिण विभागांतर्गत जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्रदान.

-------------------------------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ४१ वर सादर करण्यांत आलेला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**<u>ठराव क्रमांक - १३९/ १२२१</u>**

उपमुख्य अभियंता-परिमंडळ-४ मधील ग-उत्तर, फ-उत्तर, फ-दक्षिण विभागातील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदातपत्रास

| अ.क. | विभाग | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | ग उत्तर | रु.६,००,०००/- |
| २. | फ- उत्तर | रु. ३,००,०००/- |
| ३. | फ-दक्षिण | रु.६,८१,०००/- |

अशी एकूण रक्कम रु- १५,८१,०००/- सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o-----------

**बाब क्र.१३९.४**

विषय - ३०-३० महिला पटेल रोड या इमारतीच्या प्रशासकीय मान्यतेच्या रकमेत झालेल्या बदलाबाबत शुध्दीपत्रक.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ट क्र.४२ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

<u>ठराव क्रमांक - १३९/१२२२</u>

सविस्तर चर्चेअंती ३०-३० अे महिला पटेल रोड या इमारतीच्या प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.२४,५८६९ ऐवजी रु.९,३८,९४४/- अशी वाचण्यास व त्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

--------------o-------o------------

<u>बाब क्रमांक - १३९ -५ पुनर्विकास</u>

विषय - मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

-------------------------------------

मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासा करीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे १२ प्रस्ताव पृष्ठ क्र. ४५ ते ९६ वर मंजूरीसाठी सादर करण्यांत आले आहेत. सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

१. भुकर पहाणी क्र.१५९८ मांडवी विभाग, इ.क्र.१५-१७ निशानपाडा क्रॉस लेन, मुंबई - ४००००९ येथील **"लियाकत मंझील"**.
२. भुकर पहाणी क्र.१३४० मांडवी विभाग, **इ.क्र.७८** कांबेकर स्ट्रिट, मुंबई ४०० ००९.
३. भुकर पहाणी क्र.१७४८-भुलेश्वर विभाग, इमारत क्र.८६-९०, डॉ.आत्माराम मर्चन्ट रोड, भुलेश्वर, मुंबई येथील **"मनहर भवन"**.
४. भुकर पहाणी क्र.५८८, गिरगाव विभाग, इ.क्र.१७९-१८३, उपकर क्र.डी-१३०३(३), वी.पी.रोड, मुंबई ४००००४ येथील **"मानेक बिल्डिंग"**.
५. भूकर पहाणी क्र.५४३,गिरगांव विभाग,सदाशिव क्रॉस लेन,गिरगांव,मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकास योजनेत सदर मालमत्तेवरील पूर्वी तोडण्यांत आलेल्या इ.क्र.४४ए उपकर क्रमांक.डी१३१० सदाशिव क्रॉस लेन या जुन्या उपकरप्राप्त इमारतीचा समावेश करुन सुधारित ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.
६. भुकर पहाणी क्र.१३८७ भायखळा विभाग, इ.क्र.३३ टँक स्ट्रीट, मुंबई येथील **"रुबी मंझील"**.
७. भुकर पहाणी क्र.३५२ - परेल शिवडी विभाग, इ.क्र.४०-क्यु, भंगवंतराव परळकर मार्ग, परेल, मुंबई-१२ येथील **"कुलदीप हाऊस"**.
८. अंतिम भुखंड क्र.२७३-टी.पी.एस.-३, माहिम विभाग, इमारत क्र.१०८, सेनापती बापट मार्ग, माहिम, मुंबई-१६ येथील **"नायर महल"**.

२५७६

९. अंतिम भुखंड क्र. १७९, १८०, १८९, १८९(१), १८९(२), १८९(४), १९० व १९१, टी.पी.एस.४, माहिम विभाग, इ.क्र. ११-११डी, १५एच, १७-१७डी, १३-१३डी, १५जी,१५एफ, १५-१५ए व १९-१९एफ, गोखले रोड व सेना भवनपथ, दादर (प), मुंबई-२८ येथील **"खत्राडा मॅन्शन, मोहमदी मंजील, लाहेर मॅन्शन, करोलीया ट्रस्ट, अहमद बिल्डिंग, समाधान बिल्डिंग, सारा मॅन्शन व बालकृष्ण सदन"**.

१०. भुकर पहाणी क्र.१०९२ - माहिम विभाग, इमारत क्र.२४-डी, कॅन्डल रोड, दर्गा स्ट्रीट, माहिम, मुंबई १६ येथील **"चीस्टी मंजील"**.

११. भुकर पहाणी क्र.१०३/७४ परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.७४, सुपारी बाग इस्टेट, इमारत क्र.१ ९१-१९९,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई ४०००१२ येथील **"पुरंदरे सदन"**.

१२. भूकर पहाणी क्रमांक ७६४, गिरगांव विभाग, इ.क्र.८,खेतवाडी ३ री गल्ली, **"दाजीबा हाऊस"**.

<u>ठराव क्रमांक - १३९ / १२२३</u>

मुंबई बेटावरील अ वर्गातील खालील १२ मालमत्तावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावास नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली .

१. भुकर पहाणी क्र.१५९८ मांडवी विभाग, इ.क्र.१५-१७ निशानपाडा क्रॉस लेन, मुंबई - ४००००९ येथील **"लियाकत मंझील"**.

२. भुकर पहाणी क्र.१३४० मांडवी विभाग, **इ.क्र.७८** कांबेकर स्ट्रिट, मुंबई ४०० ००९.

३. भुकर पहाणी क्र.१७४८-भुलेश्वर विभाग, इमारत क्र.८६-९०, डॉ.आत्माराम मर्चन्ट रोड, भुलेश्वर, मुंबई येथील **"मनहर भवन"**.

४. भुकर पहाणी क्र.५८८, गिरगाव विभाग, इ.क्र.१७९-१८३, उपकर क्र.डी-१३०३(३), वी.पी.रोड, मुंबई ४००००४ येथील **"मानेक बिल्डिंग"**.

५. भूकर पहाणी क्र.५४३,गिरगांव विभाग,सदाशिव क्रॉस लेन,गिरगांव,मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकास योजनेत सदर मालमत्तेवरील पूर्वी तोडण्यांत आलेल्या इ.क्र.४४ए उपकर क्रमांक.डी१३१० सदाशिव क्रॉस लेन या जुन्या उपकरप्राप्त इमारतीचा समावेश करुन सुधारित ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

३. भुकर पहाणी क्र.१३८७ भायखळा विभाग, इ.क्र.३३ टँक स्ट्रीट, मुंबई येथील **"रुबी मंझील"**.

४. भुकर पहाणी क्र.३५२ - परेल शिवडी विभाग, इ.क्र.४०-क्यु, भंगवंतराव परळकर मार्ग, परेल, मुंबई-१२ येथील **"कुलदीप हाऊस"**.

५. अंतिम भुखंड क्र.२७३-टी.पी.एस.-३, माहिम विभाग, इमारत क्र.१०८, सेनापती बापट मार्ग, माहिम, मुंबई-१६ येथील **"नायर महल"**.

९. अंतिम भुखंड क्र. १७९, १८०, १८९, १८९(१), १८९(२), १८९(४), १९० व १९१, टी.पी.एस.४, माहिम विभाग, इ.क्र. ११-११डी, १५एच, १७-१७डी, १३-१३डी, १५जी,१५एफ, १५-१५ए व १९-१९एफ, गोखले रोड व सेना भवनपथ, दादर (प), मुंबई-२८ येथील **"खत्राडा मॅन्शन, मोहमदी मंजील, लाहेर मॅन्शन, करोलीया ट्रस्ट, अहमद बिल्डिंग, समाधान बिल्डिंग, सारा मॅन्शन व बालकृष्ण सदन"**.

१०. भुकर पहाणी क्र.१०९२ - माहिम विभाग, इमारत क्र.२४-डी, कॅंडल रोड, दर्गा स्ट्रीट, माहिम, मुंबई १६ येथील **"चीस्टी मंजील"**.

११. भुकर पहाणी क्र.१०३/७४ परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.७४, सुपारी बाग इस्टेट, इमारत क्र.१ ९१-१९९,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई ४०००१२ येथील **"पुरंदरे सदन"**.

१२. भूकर पहाणी क्रमांक ७६४, गिरगांव विभाग, इ.क्र.८,खेतवाडी ३ री गल्ली, **"दाजीबा हाऊस"**.

-----------------oo------------------------

**बाब क्रमांक - १३९.६ (१)**

विषय - परिमंडळ-१ व ४ मधील दुरुस्ती कामाला प्रशासकीय मान्यतेवरील रक्कमेस मंजूरी मिळण्याबाबत.
१. इ. क्र. ३४-३८ जे.डी.लेन.

------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **९७** वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले

**ठराव क्रमांक - १३९/ १२२४**

इ.क्र.३४-३८ जे.डी.लेन प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.६,९७,४४७/- ऐवजी जास्त होणारी रक्कम रु.७,२६,६६९/- या जादा होणारा रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

१०६

. **बाब क्रमांक - १३९.६ (२)**

२. विषय- इमारत क्र.१३५ नवाब चेंबर, गोविंदजी केणी रोड, मुंबई.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ९९ वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

<u>ठराव क्रमाक - १३९/ १२२५</u>

इ.क्र.१३५ नवाब चेंबर, गोविंदजी केणी रोड,मुंबई इमारतीचे क्षेत्रफळ- ८४२.५६ तथापि प्रचलित मर्यादा रु. २०००/- प्रति चौ.मी. प्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.१६,८५,१२०/- पेक्षा मूळ मंजूरी पेक्षा जास्त होणारी रक्कम रु.५७,८४४/- या जादा होणारा रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

---oo---

**मा.सभापती तथा मुख्य अधिकारी यांच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय घेण्याचे ठरले**

<u>बाब क्रमांक -१३९.२ (३)</u>

विषय - उपकर प्राप्त इमारतींच्या **दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी** प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-१** मधील (अे, सी-१, सी-२ व सी-३) २९ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **१०१ ते १६१** वर सादर करण्यांत आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

<u>ठराव क्रमांक - १३९/ १२२६</u>

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण २९ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.३,८५,१३,७३१ /-(रुपये-तीन कोटी पच्याऐंशी लक्ष तेरा हजार सातशे एकतीस फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. २,३४,०३,४७०/- (रुपये दोन कोटी चवतीस लक्ष तीन हजार सत्तर फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

२०६

---oo---

**बाब क्रमांक -१३९.२ (४)**

**विषय - परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, डी-३, ग-द) ०९ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **११७ ते १२७** वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

------------

**ठराव क्रमांक - १३९/ १२२७**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०९ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,२८,१७,४७० /-(रुपये- दोन कोटी अठ्ठावित लक्ष सतरा हजार चारशे सत्तर फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १,५३,८१,४०५ /- (रुपये एक कोटी त्रेपन्न लक्ष एक्यांऐशी हजार चारशे पाच फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

---------------------------

**बाब क्रमांक -१३९.२ (५)**

**विषय- परिमंडळ-३** मधील (बी, ई-१ व ई-२) ५० इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **१२९ ते १४५** वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

----------------

**ठराव क्रमांक - १३९/१२२८**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ५० उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१०,२९,६९,१२१ /-(रुपये- दहा कोटी एकोणतीस लक्ष एकोणसत्तर हजार एकशे एकविस फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ५,२८,८१,६४०/- (रुपये पाच कोटी अठ्ठाविस लक्ष एक्याऐशी हजार सहाशे चाळीस फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

२५०६

---------------

**बाब क्रमांक -१३९.२ (६)**

**विषय- परिमंडळ-४** मधील (ग-उत्तर) ०६ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **१४७ ते १५१** वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३९/ १२२९**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०६ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१,०८,०६,५७७ /-( रुपये एक कोटी आठ लक्ष सहा हजार पाचशे सत्याहत्तर फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.७५,३६,११७ /- (रुपये पंच्याहत्तर लक्ष छत्तीस हजार एकशे सतरा फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o-----------

**बाब क्रमांक -१३९.२ (७)**

**विषय- परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, डी-३) ०५ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **१५३ ते १६१** वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३९/१२३०**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०५ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.६४,९३,८३५ /-(रुपये- चौसष्ट लक्ष त्रैण्णव हजार आठशे पस्तीस फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ३७,९९,९३२ /- (रुपये सदतीस लक्ष नव्यानव हजार नऊशे बत्तीस फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o-----------

**बाब क्रमांक -१३९.२ (८)**

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ -१ मधील अ,सी-१,सी-२ व सी-३ विभागातील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्याबाबत.

१७६

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १६३ वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले

-----------

**ठराव क्रमांक - १३९/ १२३१**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १२ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१,८९,७८,१४५ /-(रुपये- एक कोटी एकोनव्वद लक्ष अठयात्तर हजार एकशे पंचेशाळीस फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १,४१,१३,७३९ /- (रुपये एक कोटी एकेचाळीस लक्ष तेरा हजार सातशे एकोणचाळीस फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o-----------

**बाब क्रमांक -१३९.२ (९)**

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ -३ मधील ब विभागातील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्याबाबत.

--------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १६५ वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले

**ठराव क्रमांक - १३९/१२३२**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०१ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२८,४२,१२१ /-(रुपये- अठ्ठाविस लक्ष बेचाळीस हजार एकशे एकविस फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. २२,४५,३३२ /- (रुपये बावीस लक्ष पंचेचाळीस हजार तिनशे बत्तीस फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

१०६.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

**मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,**
**मुं.इ. दु.व पु.मंडळ**

**सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता**
**मुं.इ.दु.व पु.मंडळ.**